**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**, पहिला माळा, बी विंग
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२-२५५६९१६, ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

**ई-मेलव्दारे / स्पिडपोस्टव्दारे**

क्र.कक्ष-१७/नोडल/गडचिरोली/आयडी-१२५९२/२९०४ /२०२२-२३
नागपूर ४४० ००१, दिनांक ३०/०१/२०२३

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- Proposal for diversion of 19.50 ha. forest land under Forest (Conservation) Act, 1980 for construction of Administrative builidng of Sub Police Station at Aheri, Tal.Aheri in L.W.E. Dist.Gadchiroli.

संदर्भ :-
१. Parivesh Portal वरील EDS Form व्दारे दि.१२/०७/२०२२ रोजी उपस्थित मुद्दा. F.P.N. 88
२. वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडील पत्र क्र.कक्ष-२(८)/जमीन/ प्र.क्र.३१८/२०२३/१३९९, दि.१९/०१/२०२३. F.P.N. 98

विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्र.१ व्दारे उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याच्या अनुषंगाने वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडून संदर्भ क्र.२ येथे नमूद पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात आला आहे.

पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांना शासनाकडून उपस्थित करण्यात आलेल्या मुद्याच्या अनुषंगाने विचारण करण्यात आली असता, त्यांनी दि.१८/०१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये वृत्तस्तरीय कार्यालयास अहवाल सादर केला असून सदर अहवालामध्ये नमुद केले आहे की, सदर प्रस्तावातील १९.५० हे. क्षेत्राबाबत बाबनिहाय आराखडा तयार केला updated असून पोलीस मुख्यालय अहेरी (प्राणहिता) जिल्ह्याच्या दक्षिण भागात आहे. भामरागड, हेडरी, एटापल्ली, अहेरी, सिरोंचा, जिमलगट्टा हे ६ उपविभाग व पोलीस स्टेशन, एटापल्ली, अहेरी, मुलचेरा, आष्टी, भामरागड, सिरोंचा, असरअल्ली, असे ७ पोलीस स्टेशन व जिमलगटा, रेंगुठा, बामणी, झिंगानूर, कसनसूर, लाहेरी, व्येंकटापूर, राजाराम खां, दामरंचा, रेपनपल्ली, देचलीपेठा, पेरमिली, हे १२ उपपोलीस स्टेशन तसेच पातागुडम, कोटमी, हालेवारा, बोलेपल्ली, ताडगांव, कोठी, नारगुंठा, धोडराज, येलचिल, मरपल्ली, गट्टा, हेंडरी, येमली बुर्गी, आलदंडी, सुरजागड असे १६ पोलीस मदत केंद्र अतिसंवेदनशिल भागात येत असून नक्षलविरोधी अभियानाकरीता तैनात जवानांना पायाभूत सुविधा व त्यांच्या परिवाराला सुरक्षा पुरविण्याच्या दृष्टीने ३०० निवासस्थाने बांधकाम करण्यात येणार आहे तसेच वाढत्या नक्षल कार्यवाहीच्या दृष्टीने भविष्यात पोलीस मुख्यालय अहेरी अंतर्गत १० नविन पोलीस मदत केंद्र स्थापन करणे व नविन पोलीस पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे १९.५० हे. वनक्षेत्राची बाबनिहाय आराखडा नुसार अत्यंत आवश्यकता असल्याचे कळविले आहे.

99

वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाशी हे कार्यालय सहमत असून सदर अहवाल छायांकित प्रतीच्या स्वरूपात यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

सहपत्र:-वरीलप्रमाणे

30/1/23

**(नरेश झुरमुरे)**

o/c अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

K Andhale Dt. 30/01/2023 30/1/23.

प्रतिलिपी:- वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांना माहितीस अग्रेषित.

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आल्लापल्ली यांना माहितीस.

प्रतिलिपी:- पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांना माहितीस व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
(E-mail address: sp.gadchiroli@mahaplice.gov.in)